**आकाशवाणी नागपूर,**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
**शुक्रवार दिनांक १५ मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर तीन रुपयांची वाढ.**
2. **नाफेड आजपासून राज्यात १२ रुपये ३५ पैसे किलो दरानं कांद्याची खरेदी सुरू करणार.**
3. **2023-24 साठी प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेअंतर्गत गोंदिया जिल्हा राज्यात प्रथम; ग्रामपंचायतींमध्ये वर्धा जिल्ह्यातील अजनसरा अग्रणी.**
4. **नीट युजी परीक्षा २१ जून रोजी होणार तर महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा 28 जूनला निर्धारित.**
5. **नैऋत्य मान्सून २६ मे रोजी केरळ किनारपट्टीवर दाखल होण्याची शक्यता.**

**आता सविस्तर बातम्या .......**

इंधन दरवाढ

जागतिक स्तरावर इंधनाच्या किमतीत झालेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर तीन रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या दरवाढीनंतर मुंबईत पेट्रोलचा दर १०६ रुपये ६८ पैसे प्रति लिटर तर डिझेलचा दर ९३ रुपये १४ पैसे प्रति लिटर झाला आहे.

नाफेड मुख्यमंत्री

नाफेड आजपासून राज्यात १२ रुपये ३५ पैसे किलो दरानं कांद्याची खरेदी सुरू करणार असल्याची घोषणा केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज साताऱ्यात केली. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या अंतर्गत ५ लाख घरांच्या वितरणाच्या कार्यक्रमात त्यांनी ही घोषणा केली. यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात ६ लाभार्थ्यांना घराच्या चाव्या देण्यात आल्या. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी पुढच्या आठवड्यात बैठक घेण्याचं आश्वासनही त्यांनी यावेळी दिलं.  येत्या ५ वर्षात राज्याला बेघरमुक्त करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली....

सातारा पालिकेनं उभारलेल्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज झालं.

आवास योजना

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करत गोंदिया जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे तर अकोला जिल्हा तृतीय क्रमांकावर आहे. सन 2023-24 साठीचे पुरस्कार आज सातारा इथं केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चव्हाण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेअंतर्गत नागपूर विभाग राज्यात तिसरा आहे तर राज्य पुरस्कृत आवास योजनेत नागपूर प्रथम आणि अमरावती विभाग द्वितीय क्रमांकावर आहे. राज्य पुरस्कृत आवास योजनेमध्ये प्रथम क्रमांक नांदेड जिल्ह्याला मिळाला असून अमरावती द्वितीय तर वर्धा तृतीय क्रमांकावर आहे. अकोला जिल्ह्यातील पातुर तालुक्याने प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेअंतर्गत प्रथम क्रमांक मिळवला असून नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुका तृतीय क्रमांकावर आहे. त्याचप्रमाणे राज्य पुरस्कृत आवास योजनेअंतर्गत वर्धा जिल्ह्यातील कारंजा तालुका दुसऱ्या क्रमांकावर राहिला. तर वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यातील अजनसरा या ग्रामपंचायतीला सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायतीचा प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आहे. प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यातील ससेगाव ग्रामपंचायतीला सर्वोत्कृष्ट गृह संकुल गटात राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे.

नीट युजी पुनर्परिक्षा

वैद्यकीय प्रवेशासाठीची नीट युजी पुनर्परिक्षा येत्या २१ जून रोजी घेण्यात येणार आहे. राष्ट्रीय परिक्षा संस्था - एनटीएने आज ही घोषणा केली. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली नीट परीक्षेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी काल उच्चस्तरीय बैठक झाली, त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी परिक्षेसंबंधी केवळ एनटीएच्या अधिकृत सूत्रांवरच विश्वास ठेवावा, असं आवाहन संस्थेनं केलं आहे. दरम्यान, विद्यार्थी हे शासनाचं प्राधान्य असून त्यांच्याप्रति शासन संवेदनशील असल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. नीट परिक्षेसंदर्भात ते आज दिल्लीत माध्यमांशी बोलत होते. २१ तारखेला होणार्या या परिक्षेचं प्रवेशपत्र विद्यार्थ्यांना १४ जून रोजी मिळणार असल्याचं प्रधान यांनी सांगितलं. ही परीक्षा संगणकीय प्रणालीवर आधारित घेण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

महाटीईटी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आयोजित करण्यात आलेली 'महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) - 2026' आता 21 जूनऐवजी 28 जून रोजी घेण्यात येणार आहे. राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात NTA कडून

त्याच दिवशी नीट परीक्षा आयोजित करण्यात आल्याने केंद्रांवरील ताण टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. सुधारित वेळापत्रकानुसार पहिला पेपर  सकाळी 10.30 ते 1 वाजेपर्यंत, तर दुसरा पेपर दुपारी 2.30 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत होईल. उमेदवारांना 16 जूनपासून mahatet.in या संकेतस्थळावरून प्रवेशपत्र डाउनलोड करता येणार आहेत.

डॉ.आनंद नाडकर्णी

प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ आनंद नाडकर्णी यांचं आज पहाटे ठाणे इथं निधन झालं, ते ६८ वर्षांचे होते. गेल्या आठवड्यात झालेल्या शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीसंदर्भात झालेल्या गुंतागुंतीमुळे डॉ नाडकर्णी यांचं निधन झाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. नाडकर्णी यांची अनेक नाटकं तसंच पुस्तकं प्रसिद्ध आहेत. त्यांच्या अनेक साहित्यकृतींना पुरस्काराने गौरवण्यात आलं आहे. मानसोपचाराला सामाजिक बांधिलकी मानून दीपस्तंभासारखे कार्य करणाऱ्या संवेदनशील व्यक्तिमत्त्वाला आपण मुकलो आहोत, अशी भावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाडकर्णी यांना भावपूर्ण अर्पण केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही नाडकर्णी यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे.

जलसमाधी आंदोलन

भंडारा जिल्ह्यातील कारधा इथल्या वैनगंगा नदीवर काँग्रेसच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या जलसमाधी आंदोलनाला प्रतिसाद मिळत असून शेकडो कार्यकर्ते आणि नागरिक आंदोलनात सहभागी झाले आहेत. काँग्रेस नेते तथा माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खासदार डॉ. प्रशांत पडोळे आणि गडचिरोलीचे खासदार डॉ नामदेव किरसान यांच्या नेतृत्वाखाली आंदोलकांनी वैनगंगा नदीच्या पात्रात उतरून सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. धान खरेदी, बोनस, पिकविमा आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्या तातडीने पूर्ण करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

आयआयएमसी

अमरावतीच्या भारतीय जन संचार संस्थान- आयआयएमसी- मध्ये मराठी पत्रकारिता पदव्युत्तर डिप्लोमा अभ्यासक्रमासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० मे पर्यंत वाढविण्यात आली आहे. प्रवेश परीक्षा ५ जून रोजी होणार असून इच्छुक विद्यार्थ्यांना गूगल फॉर्मद्वारे किंवा अमरावती येथील कार्यालयात प्रत्यक्ष अर्ज करता येणार आहे. एक वर्षाच्या या अभ्यासक्रमासाठी कोणत्याही शाखेतील पदवीधर विद्यार्थी अर्ज करू शकतील.  प्रवेशासाठी सीईटी परीक्षा अमरावतीतील संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरातील पश्चिम क्षेत्रीय केंद्रासह पुणे आणि मुंबई येथेही आयोजित करण्यात येणार आहे.

खिंडसी धरण

भंडारा तसेच नागपूर जिल्ह्यातील सुर नदी लगत असलेल्या नगर पंचायत आणि ग्रामपंचायती करीता आकस्मिक पाणी मागणी करण्यात आल्याने पेंच प्रकल्पाच्या खिंडसी धरणातून आज दुपारी ४ वाजता २५ क्युसेक पाणी नदीत पात्रात सोडण्यात आलं आहे. नदी काठावरील गावांसाठी सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. सध्यस्थितीत धरणातील पाणी पातळी ३१४.९५ मीटर असून धरणाचा जिवंत साठा ६६ पूर्णांक ८८ इतका आहे.

एचटीबीटी कापूस

गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यातील रामसागर इथं कृषी विभागाच्या भरारी पथकाने अनधिकृत एचटीबीटी कापूस बियाण्यांच्या साठ्यावर धाड टाकली. या कारवाईत ३७ संशयित बियाण्यांची पाकिटे, सीलिंग मशीन आणि कोरे पॅकेट असा ३५ हजार ४३७ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधीतांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नैऋत्य मान्सून

भारतीय हवामान खात्याने नैऋत्य मान्सून नेहमीपेक्षा लवकर केरळ किनारपट्टीवर दाखल होण्याची शक्यता व्यक्त केली असून २६ मे रोजी मान्सून केरळात पोहोचू शकतो, असा अंदाज वर्तवला आहे. पुढील काही दिवसांत दक्षिण भारतासह ईशान्येकडील राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशाराही देण्यात आला आहे. महाराष्ट्रात ५ जूनपर्यंत गोवामार्गे मान्सून दाखल होऊन ७ जूनपर्यंत पुण्यासह काही भागांत सक्रिय होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

हवामान

अमरावती, वर्धा आणि नागपूर जिल्ह्यात उद्यापासून 19 तारखेपर्यंत उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे. तर आज अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट आहे. आज दुपारी अडीच वाजता नोंदवलेल्या तापमानानुसार विदर्भात अमरावती जिल्हा 44. 8 दशांश अंश सेल्सियस सह सर्वात उष्ण ठरला आहे. त्या पाठोपाठ वर्धा इथं 44.5 तर अकोला इथं 44.4 इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. नागपुरात 43.4 तर बुलढाणा, ब्रह्मपुरी, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये तापमान 40 ते 42 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. दुपारपासून नागपुरात ढगाळ वातावरण आहे. नागपुरात आगामी दोन तासात वादळी पर्जन्यमानासह हलक्या पावसाची शक्यता प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.

## मुष्टियुद्ध स्पर्धा

उझबेकिस्तानमध्ये ताश्कंद इथं पार पडलेल्या आशियाई मुष्टियुद्ध पंधरा वर्षांखालील मुलांच्या अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं 9 सुवर्ण, 6 रौप्य आणि 12 कांस्य अशी 27 पदकांची कमाई केली.

## आयपीएल

आयपीएल क्रिकेटमध्ये आज लखनौ सुपर जायंट्स आणि चेन्नई सुपर किंग्जमध्ये सामना होईल. लखनौमध्ये आज साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

## डिजिटल नोंदणी

बुलढाणा जिल्ह्यातील उन्हाळखेड  हे शेगाव तालुक्यातील स्व-गणना करणारे पहिले गाव ठरले असून एकाच दिवसात २० कुटुंबांची डिजिटल नोंदणी करण्यात आली. ग्रामस्थ आणि तरुणांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे जनगणना मोहिमेला वेग मिळाला असून डिजिटल साक्षरतेचे आदर्श उदाहरण गावाने निर्माण केले आहे.  उद्या अर्थात १६ मेपासून प्रगणक घरोघरी भेट देणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

*****